स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२३ दिनांक :-२४ मे, २०२३

जळगाव दि. २४ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकपदी लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातंर्गत इंस्टिट्युट ऑफ पेट्रोकेमिकल्स इंजिनिअरींग येथे अधिव्याख्याता पदावर कार्यरत प्रा.योगेश पाटील यांची निवड करण्यात आली आहे.

विद्यापीठाने शनिवार दि.२० मे रोजी परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकपदासाठी मुलाखती आयोजित केल्या होत्या. त्यामधून प्रा. योगेश पाटील यांची परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकपदी निवड करण्यात आली आहे. त्यानुसार प्रा. पाटील यांना विद्यापीठाकडून नियुक्तीपत्र पाठविण्यात आले आहे. प्रा. योगेश पाटील लोणेरे येथे अधिव्याख्याता पदावर इंस्टिट्युट ऑफ पेट्रोकेमिकल्स इंजिनिअरींग येथे कार्यरत आहेत. त्यांनी एम.टेक.(संगणकशास्त्र) ही पदवी सुवर्ण पदकासह लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातून प्राप्त केली आहे. अध्यापनाचा त्यांना २८ वर्षेपेक्षा अधिक अनुभव असून त्यांनी त्याच विद्यापीठात सहयोगी परीक्षा नियंत्रक म्हणून ६ वर्षे, परीक्षा नियंत्रक पदाचा ६ वर्षे तसेच औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात एक वर्ष परीक्षा नियंत्रक पदाचा अनुभव त्यांना आहे. प्रा.पाटील यांची निवड पुढील पाच वर्षासाठी असेल.

सद्यस्थितीत विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक म्हणून प्रा.दीपक दलाल हे दि. १७ डिसेंबर २०२१ पासून काम पाहत आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करिता